# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्संस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनाक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम कमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ जमनालाल बजाज प्रशासकिय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, विद्यापीठ कॅम्पस चौकत अंबाझरी टी—पॉईट मार्ग, नागपूर ४४००३३


पत्र क्रमांक रातुमनावि / विद्या / २१ / ०२ | दिनांक ६ एप्रिल, २०२१

## : अधिसूचना :

सर्व संबधीतांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कलम ४०(२)(ग)च्या तरतुदिनुसार अभ्यासमंडळाच्या निवडणुका संपन्न झाल्या होत्या. यात निवडणुकी द्वारे निवडुन आलेल्या सदस्याबाबत अधिसूचना क्रमांक रातुमनावी / साप्र / निवडणूक / १७ / २२ दिनांक २९ नोव्हेंबर २०१७ निर्गमित करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कलम ४०(२)(ख)(एक)(दोन)(तीन)च्या तरतुदिनुसार मा.कुलगुरू महोदयांनी नामनिर्देशन केलेल्या सदस्यांबाबत अधिसूचना क्र. Acad/ 2018/536 दिनांक ०३ एप्रिल २०१८ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. यानंतर अभ्यासमंडळाची प्रथम सभा आयोजित करण्यात आली होती. अभ्यासमंडळाने प्रथम सभेत अधिनियमातील कलम४०(२) (घ) (दोन)व (तीन)च्या तरतुदिनुसार अभ्यासमंडळावर सदस्यांची स्विकृती केली होती. याबाबत अधिसूचना क्र. RTMNU/Acad/ 2018/716 दिनांक १९ जुलै २०१८ निर्गमित करण्यात आली आहे.

उपरोक्त नुसार अभ्यासमंडळ सदस्यांबाबत वेळोवेळी अधिसूचना निर्गमित झालेल्या आहेत. परंतु यातील खालील अभ्यासमंडळावर सदस्य वा अध्यक्षांकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब (असाधारण कमांक १०९)अन्वये निर्गमित अधिसूचनेतील तरतुदी नुसार पात्र व्यक्ती मिळाले नसल्यामुळे अभ्यासमंडळांचे संपुर्ण गठन झालेले नाही., त्यामुळे या अभ्यासमंडळावर नियमित अध्यक्ष नाहीत. त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार विद्यापीठातील विविध विषयांच्या परीक्षा समित्या, संशोधन व मान्यंता समित्या व इतर वैधानिक समित्यावरील कामे करण्यास अडथळा निर्मान होत असतो.

दिनांक २६ फेब्रुवारी,२०२१ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषद सभेत प्रस्ताव क्रमांक ३० नुसार विद्यापरिषद मा.सदस्य डॉ. संजय कविश्वर यांनी ठराव मांडला होता की, ज्या अभ्यासमंडळांचे पुर्ण गठन झालेले नाही. त्यामुळे त्या अभ्यासमंडळावरील अध्यक्ष पद रिक्त आहेत. तर काही अभ्यासमंडळांच्या अध्यक्ष पदाकरिता पात्र व्यक्ती मिळाले नसल्यामुळे अध्यक्षांचे पद रिक्त आहेत. अशा अभ्यासमंडळावर समन्वयकांची (Co-ordinator) नामिती करावी. सदर प्रस्तावास विद्यापरिषदेने मान्यता प्रदान केली असून समन्वयका (Co-ordinator) ऐवजी नामित व्यक्तीस तदर्थ अध्यक्ष(Ad-hoc Chairman) किंवा अध्यक्ष,तदर्थ अभ्यासमंडळ(Chairman of the Ad-hoc board)असे संबोधावे आणि त्यांची सेवा नियमित अध्यक्षा प्रमाणे घ्यावी असे ठरविण्यात आले आहे. तसेच याबाबत कार्यवाही घेण्याचे अधिकार विद्यापरिषदेने मा. कुलगुरू महोदयांना प्रदान केलेले आहेत.

**करिता मा. कुलगुरू महोदयांनी खालील अभ्यासमंडळावर तदर्थ अध्यक्ष(Ad-hoc Chairman)म्हणुन खालील व्यक्तींची नामिती केली आहे. त्यामुळे नवनियुक्त तदर्थ समितींच्या अध्यक्षांनी विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार पुढील, आदेशापर्यंत कार्य करावे हि विनंती. सदर अभ्यासमंडळावर नियमित अध्यक्षांकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब(असाधारण**

क्रमांक १०९)अन्वये निर्गमित अधिसूचनेतील तरतुदी नुसार जर पात्र व्यक्ती मिळाले तर त्या अभ्यासमंडळावरिल मा.अध्यक्षांची तदर्थ(**Ad-hoc Chairman**) नामिती आपोआप रदद होईल याची संबधितांनी नोंद घ्यावी.

अभ्यासमंडळनिहाय तदर्थ अध्यक्षांची नावे खालील प्रमाणे आहे

| Sr.No | Name of the Board of Studies | Ad-hoc Chairman |
|---|---|---|
| 1 | Mathematics | Dr.Goverdhan S. Khedekar |
| 2 | Geology | Dr. Yogesh A.Murkute |
| 3 | Civil Engineering | Dr. Avinash N.Shrikhande |
| 4 | Mechanical Engineering | Dr. Sanjeeo Kumar Chaoudhary |
| 5 | Electrical Engineering | Dr. Sanjay Kelo |
| 6 | Metallurgical, | Dr. Prashant P.Parhad |
| 7 | Architecture | Dr. Ujwala Chakradeo |
| 8 | Applied Science & Humanities | Dr. Devashish Bhowmik |
| 9 | Production Engineering | Dr. Rajesh H.Parikh |
| 10 | Human Development, | Dr. Lalchand P. Dalal |
| 11 | Extension Education | Dr. Rajkumar R.Khapekar |
| 12 | Family Resource Management | Dr. Vandana R.Dhawad |
| 13 | Hotel Management And Catering Technology | Dr. Nandita A.Sapra |
| 14 | Law | Dr. Vijayata G.Uike |
| 15 | Ancient Indian History, Culture And Archeology | Dr. Preety A. Trivedi |
| 16 | Education | Dr. Ujwala D.Sadaphal |
| 17 | Urdu | Dr. Feroz Haidry |
| 18 | Fine Arts | Dr. Sanyukta Thorat |
| 19 | Environmental Sciences | Dr. Sanjay Lakhan Pal |

मा. कुलगुरुंच्या आदेशानुसार

(डॉ.अनिल हिरेखन)
कुलसचिव

प्रतिलिपी माहितीकरीता :–

१. मा. कुलगुरू,
२. मा. प्र– कुलगुरू,
३. मा. कुलसचिव,
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ
५. मा. वित्त व लेखाअधिकारी,
६. सर्व विद्याशाखेचे मा. अधिष्ठाता,
७. उपरोक्त तक्त्यातील सर्व अभ्यासमंडळांचे मा.अध्यक्ष व सदस्य,
८. विद्यापीठाचे सर्व अधिकारी,
९. डॉ.(श्रीमती) विना प्रकाशे, माहितीशास्त्रज्ञ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

(संजय भोयर)
अधिक्षक(विद्या)अ.प्र